# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल

**डॉ. ए.पी.कांबळे** राज्यशास्त्र विभाग प्रमुख भोगावती महाविद्यालय ,कुरुकली

---

**प्रस्तावना**

भारतीय समाजसुधारक स्त्री हक्कांची भूमिका घेताना हिंदू धर्मशास्त्रानी निर्माण केलेल्या अघोरी प्रथा, परंपराच्या विरोधात लढाताना, फक्त रूढींमध्ये बदल करू इच्छित होते. पण धर्माच्या सामाजिक नियमनांची चिकित्सा करण्यास कोणीच तयार नव्हते. डॉ. आंबेडकर मात्र स्त्रियांच्या लढ्याची सुरुवात या सर्व विषमतेच्या मुळावर प्रहार करून करतात. त्यांनी स्त्रियांना पशुहुनही हीन लेखण्यात यावे असे नीतीनियम लादणाऱ्या 'मनुस्मृती' धर्मग्रंथाचे दहन केले. यावरून स्पष्ट होते की, भारतातील समाज सुधारकांच्या वरवरच्या कौटुंबिक चालीरितील सुधारणांवर डॉ. आंबेडकर विसंबून राहत नाहीत तर विषमतेच्या निर्मितीचे मूळ जी मनुस्मृती आहे तिचे दहन करून स्त्रियांच्या शोषण, अन्याय, अत्याचार व व्यभिचार लादणाऱ्या नियमांचा मूळ स्तोत्र उध्वस्त करताना दिसतात. हा त्यांच्या स्त्री हक्काच्या चळवळीचा वेगळेपणा आहे व तोच शाश्वत आहे असे दिसून येते.

**स्वातंत्र्योत्तर काळातील हिंदू कोड बिल**

भारतीय समाजातील सर्व विचाराचा परामर्श घेऊन सर बी. एन.राव यांच्या अध्यक्षतेखालील सिलेक्ट कमिटीने हिंदू कोड बिलाचा एक मसुदा तयार केला. बिल ११ एप्रिल, १९४७ रोजी जोगेंद्रनाथ मंडल यानी लोकसभेत विचारार्थ ठेवले. पण याच काळात भारताच्या स्वातंत्र्याच्या सत्तांतराची प्रक्रिया सुरू झाली. हिंदू कोड बिलावरील संसदीय सोपस्कार त्या वेळी झाले नाहीत. अशाच काळात भारताच्या सत्तांतरनाचा एक भाग म्हणून ३ ऑगस्ट, १९४७ रोजी भावी स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळाची निर्मिती झाली. या मंत्रिमंडळात स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांचा समावेश झाला. १५ ऑगस्ट, १९४७ ला भारत स्वतंत्र झाला व २९ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वतंत्र भारताचे संविधान बनविण्याची ऐतिहासिक कामगिरी भारताचे पहिले कायदामंत्री डॉ. आंबेडकर यांच्यावर सोपविण्यात आली.

डॉ. आंबेडकर यांच्यावर भारताच्या संविधानाची निर्मिती करण्याची महत्त्वाची जबाबदारी येऊन पडली होती. पण त्या बरोबरच भारतीय भूमीवरील सर्व हिंदूंना एका समान कायद्याखाली आणून संपूर्ण भारतात एकात्मता निर्माण करण्याची गरज होती. सर्व हिंदूंच्यामध्ये एका समान कायद्याची रचना करून त्यांच्यामध्ये एकात्म व्यवस्था व नियम कायद्याने तयार करणे गरजेचे होते. स्वतंत्र भारताच्या पहिल्या कायदेमंडळापुढे जोगेंद्रनाथ मंडल यांनी कायदेमंडळात मांडलेले हिंदू कोड बिल पुनर्विचारासाठी मांडावे असे ठरले. पण कायदेमंडळात मांडण्यापूर्वी भारताचे पहिले कायदामंत्री डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक सिलेक्ट कमिटी नेमून हिंदू कोड बिलाची फेर तपासणी करावी असे ठरले. ९ एप्रिल, १९४८ रोजी डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली कायदेतज्ज्ञ, विद्वान, समाजसुधारक व स्त्रिया अशा एकूण वीस लोकांची सिलेक्ट कमिटी नेमण्यात आली.

**डॉ. आंबेडकरांचे हिंदू कोड बिल**

डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखालील हिंदू कोड बिलावरील सिलेक्ट कमिटीने राव यांच्या बिलाचा परामर्श घेतला. पुन्हा डॉ. आंबेडकर यांच्या कमिटीने विविध कोर्टाचे निकाल, रूढी , प्रथा, परंपरा, धर्मशास्त्रे यांच्या आधारावर हिंदू कोड बिल तपासून पाहिले. अगोदरचे राव कमिटीचे बिल केवळ वारसा हक्क व विवाह या बाबीपुरते मर्यादीत होते. पण स्वतंत्र भारतात हिंदू कायद्याचे संहितीकरण करून एकच कोड बनविण्याची आवश्यकता होती. वारसा व विवाह या बाबींसोबतच दत्तक विधान, घटस्फोट, पोटगी व उत्तराधिकारी यांचाही विचार करणे गरजेचे होते. या गरजेच्या बाबींचा समावेश डॉ. आंबेडकरांनी नवीन बिलात केला. हा मूलभूत फरक राव व डॉ. आंबेडकर यांच्या हिंदू कोड बिलात आहे. संपूर्ण हिंदू कायद्याचे कोड बनविण्याचा क्रांतिकारी निर्णय डॉ. आंबेडकरांनी घेतला. या क्रांतिकारी निर्णयावर आधारीत पुनर्बाधणी केलेले नवीन हिंदू कोड बिल १२ ऑगस्ट, १९४८ रोजी कायदेमंडळात सादर करण्यात आले. इथून पूढे हिंदू कोड बिल डॉ. आंबेडकरांच्या नावानेच ओळखले जाऊ लागले. हे बिल भारत सरकारच्या २१ ऑगस्ट, १९४८ च्या गॅझेटमध्ये पृष्ठ ४८९ ते ५५० यावर छापून प्रसिद्ध करण्यात आले. डॉ. आंबेडकरांनी तयार केलेल्या व भारत सरकारच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध झालेल्या बिलाबाबत 'हिंदू कोड बिल' यावर वर्तमान पत्रांतून जेव्हा जेव्हा संदर्भ देण्यात येत, तेव्हा तेव्हा त्याला 'आंबेडकरस्मृती' असे संबोधण्यात येत असे. यावरून स्पष्ट होते की, ज्या मनुस्मृतीने स्त्रियांना विषमतेच्या निखाऱ्यात लोटले. त्या विरोधात उभे राहून स्त्रियांना समतेचे व सन्मानाचे जीवन देण्यासाठी डॉ. आंबेडकरांचे बिल तयार झाले होते. या डॉ. आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलाला तीव्र व उग्र स्वरूपाचा विरोध झाला. पण डॉ. आंबेडकरांना या सर्व हिंदू कायद्याचे

संहितीकरण करावयाचे होते. जे भारताच्या राष्ट्रबांधणीसाठी गरजचे होते. हिंदू धर्मशास्त्रांनी स्त्रियांवर लादलेल्या अमानुष प्रथा, परंपरा आणि स्त्रियांनीही काही प्रमाणात स्वीकारलेल्या जोखडातून त्यांना मुक्त करण्याचा डॉ. आंबेडकरांचा ध्यास दिसून येतो.

**हिंदू कोड बिल**

डॉ. आंबेडकरांनी तयार केलेले हिंदू कोड बिल ९ भागात, १३९ कलमात व ७ परिशिष्टात विभागलेले होते. प्रामुख्याने या विलात विषमता, भेदभाव, असमानता तयार करून स्त्रियांना बंदिस्त करणाऱ्या धर्माच्या रूढी परंपरा थांबवण्याचा उद्देश होता. तर दुसऱ्या बाजूला विवाहाचे नियम, एकपत्नीत्व, पुरूषांप्रमाणे स्त्रियांनाही घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्क, मुलीला वडीलांच्या संपत्तीत अधिकार, दत्तक विधान, पोटगी इत्यादी अधिकार स्त्रियांना बहाल करून समतेवर, मानवतेवर आधारलेला समाज निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकर हे क्रांतिकारी कार्य करीत होते.

या कायद्याच्या प्रारंभीच हे स्पष्ट करण्यात आले आहे की, हा कायदा भारतातील सर्व घटक राज्यास लागू असेल. तसेच तो सर्व हिंदूस म्हणजे वीरशैव, लिंगायत, ब्राह्मो - प्रार्थना – आर्यसमाज अर्थात हिंदू धर्मास मानीत असल्याचे दाखविणारे सर्व लोकांना लागू होईल. तसेच जे धर्मानी बौद्ध, जैन अगर शीख आहेत. यांनाही हा कायदा लागू होईल. हा कायदा जो धर्माने मुसलमान, ख्रिस्ती, पार्शी अगर ज्यू नाही त्या कोणत्याही दुसऱ्या इसमास लागू असेल. यावरून स्पष्ट होते की, डॉ. आंबेडकर यांनी तयार केलेले हिंदू कोड बिल स्वतंत्र भारताच्या बहुसंख्य लोकांना एकाच कायद्याखाली आणू इच्छित होते. तसेच भारतीय स्त्रीला पुरूषाच्या समान एक व्यक्ती म्हणून हक्क बहाल करून तिला शोषणातून मुक्त करू इच्छित होते. तिला एक मानव म्हणून जीवन जगण्यास आवश्यक असणारा आधुनिक समाज निर्माण करू इच्छित होते. डॉ. आंबेडकर निर्मित हिंदू कोड बिलाने पुढील तरतुदी केल्या.

**१) विवाह**

१) सख्खे भाऊ-बहीण, सावत्र भाऊ-बहीण, चुलता आणि पुतणी, आत्या आणि भाचा अगर दोन भावांची मूले किंवा दोन बहिणींची मूले यांच्या विवाहास प्रतिबंध केला.

२) कोणत्याही दोन हिंदूंच्या मधील विवाहात पुढील अटी पूर्ण झाल्या पाहिजेत.

अ) कोणत्याही पक्षास लग्नाच्या वेळी पहिला नवरा अगर बायको जीवत नाही.

ब) कोणताही पक्ष लग्नाचे वेळी जन्मवेडा अगर वेडा नाही.

क) वराचे वय अठरा वर्षे व वधूचे वय चौदा वर्ष पूर्ण असले पाहिजे.

ड) दोन्ही पक्ष प्रतिबंध केलेल्या नात्याच्या पायऱ्यातील नसावेत.

इ) प्रत्येक पक्षाने जर त्याचे अगर तिचे वय एकवीस वर्षाचे पूर्ण झाले नसेल तर आपल्या लग्नासाठी पालकांची समंती मिळविली पाहिजे.मात्र विधवेच्या बाबत अशी संमती आवश्यक असणार नाही.

३) विवाहाची नोंदणी 'नोंदणी अधिकारी' या अधिकाऱ्याकडे तीन साक्षीदारांसह समक्ष करणे आवश्यक राहील.

**२) घटस्फोट**

घटस्फोट किंवा विवाह विच्छेदाबावत या बिलाने पती व पत्नीलाही हक्क दिले. मनुप्रणीत कायदेसंहितेत घटस्फोट न घेता पती अनेक विवाह करू शकत होता. तर पत्नीला म्हणजे स्त्रीला घटस्फोट घेण्याचा अधिकार नव्हता. या कायद्याने स्त्री व पुरुषाला एकमेकापासून घटस्फोट घेण्याचा अधिकार मिळणार होता. हा घटस्फोट खालील कारणांनी घेता येईल.

अ) विवाहाचे वेळी कोणताही पक्ष नपुंसक अगर वांझ असल्यास.

ब) पती रखेली ठेवत असेल, अगर पत्नी दुसऱ्या पुरूषाची रखेली किंवा वेश्या व्यवसाय करत असेल.

क) मनाच्या कमकुवत स्थितीत बऱ्या न होणाऱ्या रोगांबाबत उपचाराखाली

ड) दुरूस्त न होणाऱ्या महारोगाच्या अवस्थेत

इ) सहचार्याबरोबर राहणे धोक्याचे असणारा क्रूरपणा

ई) दोन वर्षांहून जास्त काळ अर्जदारास टाकून दिले असल्यास

अशा परिस्थितीत पुरूषाप्रमाणे स्त्रीलाही घटस्फोट घेण्याचा अधिकार या कायद्याने मिळणार होता. त्यामुळे स्त्रीवरील अन्याय, अत्याचार, शोषण व भोगवस्तू या बाबी नष्ट होणार होत्या अशा वरील कारणांनी कोणतीही व्यक्ती घटस्फोट घेऊ किंवा देऊ शकत होती. ही समतेची प्रक्रिया आधुनिक भारतीय समाजात निर्माण करणारी चाहुल म्हणजे डॉ. आंबेडकरांचे हिंदू कोड बिल होते.

**३) दत्तकविधान**

दत्तक विधान पत्राच्या अनुषंगाने या हिंदू कोड बिलात दोन बदल करण्यात आले होते.

१) मानसिक दृष्ट्या सदृढ व १८ वर्षे पूर्ण असलेल्या पुरूषास मुलगा दत्तक घेण्याची मुभा आहे. पण त्याला अनेक पत्नी असतील, तर किमान एका पत्नीची संमती घेतल्यावाचून दत्तक घेता येणार नाही. सदर बाबीत १८ वर्षाच्या आतील व कमकुवत मनाची पत्नी संमती देण्यास असमर्थ समजावी.

२) १८ वर्षे वयाची पूर्ण असणारी हिंदू विधवा दत्तक मुलगा घेण्यास पात्र असेल. मात्र पतीने तसे स्पष्ट केलेले असावे. या तरतुदीप्रमाणे पतीने नाव सांगितलेला मुलगा दत्तक घेण्यास १८ वर्षाच्या आतील विधवेला प्रतिबंध नाही.

अशा प्रकारे दत्तक विधानामध्ये पुरूष किंवा पतीने दत्तक घेण्याचा विचार केल्यास त्याला त्याच्या पत्नीची संमती आवश्यक मानण्यात आली. दुसरी बाब म्हणजे सज्ञान विधवेस मुलगा दत्तक घेण्याचा व १८ वर्षे वयापेक्षा कमी वयाच्या विधवेस पतीने नोंदणी केलेल्या मुलाला दत्तक घेण्याचा अधिकार मिळाला. त्यामुळे दोघांना एका समानतेच्या पातळीवर दत्तक विधानाबाबत या बिलाने आणले. पतीच्या मृत्यू पश्चात स्त्री आपल्या नवऱ्याच्या भाऊ हिस्स्यावर आपला दत्तक वारस घेऊन तो हिस्सा पुढे चालवू शकली. जो अधिकार पारंपरिक धर्मशास्त्रांनी स्त्रीला नाकारला होता तो देण्यात आला.

**४) स्त्रीला पोटगी मिळण्याचा अधिकार**

या बिलाच्या आठव्या भागात 'पोटगी' या बाबतीत -

१) सर्व बाबींमध्ये अन्न, कपडे, राहण्याचे ठिकाण, शिक्षण व वैद्यकीय औषधोपचार तसेच.

२) अविवाहीत मुलीच्याबाबत विवाहास अनुसंगीक व वाजवी खर्च यांचाही समावेश केला आहे.

या बिलातील तरतूदीनुसार हिंदू पत्नी तिच्या पतीकडून त्याच्या हयातीत आणि त्याच्या बापाकडून पालनपोषण केले जाण्याचा हक्क तिला असेल, हिंदू पत्नी जोपर्यंत पतीजवळ राहते तोपर्यंत त्याच्याकडून पालनपोषणाचा तिला हक्क असेल. तसेच खालील कारणांनी पतीजवळ न राहताही तिला पालनपोषणाचा अधिकार मिळेल,पोटगी मिळेल.

अ) तो किळसवाण्या रोगाने पीडित असेल.

ब) पतीने राहत्या घरीच रखेल ठेवली असेल.

क) क्रूरतेचा दोषी झालेला असेल.

ड) न्याय कारणाशिवाय किंवा तिच्या संमतीशिवाय पत्नीला टाकले असेल.

इ)धर्मांतर केल्याने हिंदू असण्याचे बंद झाल्यास,

फ) पत्नीचे वेगळे राहण्यास समर्थ कारण असल्यास,

या कारणांनी स्त्रीला पोटगी मिळण्याचा अधिकार ह्या विलामध्ये समाविष्ट होता. जुन्या कायद्यानुसार ती जर पतीच्या घरी राहत नसेल तर तिला असा पोटगी मागण्याचा अधिकार नव्हता.

**डॉ. आंबेडकरांचे हिंदू कोड बिलावरील आक्षेपांचे स्पष्टीकरण**

या बिलाच्या प्रसिद्धीनंतर जे खूप विवादास्पद मुद्दे मांडले गेले. अशा संघर्ष निर्माण करणाऱ्या हिंदू कोड बिलातील काही महत्त्वाच्या बाबींचे डॉ. आंबेडकरांनी स्पष्टीकरण केले. त्यामध्ये १) कायदेशीर विवाहासाठी आवश्यक गोष्ट म्हणून जाती रद्द करणे. २) एक पत्नीत्वाचा नियम तयार करणे. ३) घटस्फोटाची परवानगी देणे.या महत्त्वाच्या आक्षेपावर डॉ. आंबेडकरांनी आपला खुलासा दिला.

१) विवाह कायदेशीर ठरण्यासाठी वधू-वर एकाच वर्णाचे, जातीचे व पोटजातीचे पाहिजेत. या सनातनी विचाराच्या आड हे बिल येत नाही. पण ज्यांचा वर्ण, जात, उपजात यावर विश्वास नसणाऱ्या सुधारणावादी हिंदू व्यक्तीने जर आपल्या वर्ण, जात व उपजातीच्या बाहेरील वधू-वरांशी विवाह केल्यास त्याला कायदेशीर विवाहाची मान्यता देण्यात .त्यामुळे या बाबीवरील आक्षेप म्हणजे स्वंयनिर्णयाच्या तत्त्वाचे खंडनच होय असे म्हणावे लागेल.

२) हिंदू नवऱ्याला अनिर्बंध बहुपत्नीत्वाचा अधिकार होता. त्यामुळे या बिलात एक पत्नीत्वाचा नियम केल्याबरोबर त्यावर पुरूषप्रधान संस्कृतीने आक्षेप नोंदवला. या आक्षेपाचे खंडन डॉ. आंबेडकरांनी केले ते म्हणतात, प्रिव्ही कौन्सिलच्या अहवालानुसार दक्षिण भारतातील नतूकोट्टाई चेट्टीयार या लोकांमध्ये एकपत्नीत्वाची पध्दत आहे. पहिल्या पत्नीची संमती घेतल्याशिवाय नवऱ्यास दुसरी बायको करता येत नाही. अशी संमती दिली तरी पहिल्या पत्नीसाठी नवऱ्याला काही संपत्ती द्यावी लागते. त्याला तामीळमध्ये 'मोप्पू' असे म्हणतात. तसेच कौटिल्याच्या अर्थशास्त्रात , विवाहानंतर पहिली दहा-बारा वर्षे कोणालाही दुसरी पत्नी करता येत नव्हती. कारण या काळात पहिली पत्नी मुले होण्यास अपात्र आहे याची खात्री झाली पाहिजे. तसेच विवाहाच्या वेळी मिळालेले स्त्रीधन नवऱ्याने तिला परत केले पाहिजे. या अटीवर दुसऱ्या विवाहाचा अधिकार

दिला होता. तसेच देशाच्या ज्या भागात मरूमक कथायम आणि अलियासंथानम या कायद्यात वैवाहिक जीवनाचा नियम एकपत्नीत्व ठरविला आहे. अलिकडे मुंबई, मद्रास व बदोडा या प्रांतात एकपत्नीत्वाचा कायदा करण्यात आला आहे. सर्व जगानेच वैवाहिक जीवनात एकपत्नीत्वाला कायदेशीर तत्त्व म्हणून मान्य केले होते.

हिंदू प्रथा-परंपरांनुसार समाजात वहुपत्नीत्वाची पद्धती रूढ होती. ज्या पद्धतीमध्ये पुरूषांच्या इच्छेचा विचार केलेला होता व स्त्रीला फक्त शारीरिक उपभोगाची किंवा संभोगाची वस्तू ठरवले होते. प्रजोत्पादन हेच स्त्रीचे प्रमुख काम मानले. पुरूषांची दासी स्त्रीला बनवले व पुरूष मात्र अनेक स्त्रियांच्या बरोबर विवाह करण्यास मुक्त राहिला होता. हिंदू कोड बिलामध्ये एकपत्नीत्वाची तरतूद करताच भारतीय समाजातील पुरूषांचा अमानवीय चेहरा या तरतूदीला विरोध करताना दिसतो. या अनिष्ठ प्रथा, परपरांना धर्माच्या नावाने संरक्षण मिळविण्याचा तो पुरूषी चेहरा प्रयत्न करतो. पण डॉ. आंबेडकर स्त्रियांना मानवी चेहरा बहाल करताना एकपत्नीत्वाची जगाने व भारतातील काही प्रदेशांनी मान्य केलेली तरतूदच बहाल करतात.

३) घटस्फोटाचा अधिकार स्त्रियांना दिल्याने या बिलावर टीका झाली पण डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले की, हिंदू समाजाचा शूद्र मानला गेलेला घटक हा नव्वद टक्के आहे. तर पुढारलेल्या जाती दहा टक्के आहेत. शूद्रांच्यामध्ये घटस्फोटाची रूढी परंपरेने चालत आली होती. मग नव्वद टक्के लोकांचा कायदा हा सर्वसामान्य कायदा म्हणून पाळायचा की दहा टक्के लोकांचा कायदा नव्वद टक्के लोकांवर लादायचा असा प्रश्न डॉ. आंबेडकरांनी उपस्थित केला. डॉ. आंबेडकरांनी स्त्रीला घटस्फोटाचा कायदेशीर हक्क देऊन पुरूष प्रधान प्रथा, परंपरा, शोषण यातून बाहेर पडण्यासाठी व स्वतःचे जीवन जगण्यासाठी स्त्रीला सक्षम बनवले.

४) दत्तकविधानाच्या बाबतही काही संघर्षाचे मुद्दे आहेत. याबाबत डॉ. आंबेडकर म्हणतात, कायदेशीर दत्तक विधानासाठी डॉ. आंबेडकर प्रणीत हिंदू कोड बिलात जातीचा किंवा वर्गाचा सारखेपणा गरजेचा मानलेला नाही. त्यामुळे ब्राह्मणाला - ब्राह्मण, कायस्थाला- कायस्थ व शुद्राला- शुद्र जातीचा मुलगा दत्तक घेता येईल. पण एखाद्या पुरोगामी ब्राह्मणाला जर शूद्र मुलगा दत्तक घ्यावयाचा असेल, तर त्यास हा कायदा मान्यता देतो. हिंदू कोड बिलाबरोबर रूढीलाही वाढण्याची मोकळीक दिल्यास रूढी कायद्यावर कुरघोडी करेल असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

५) डॉ. आंबेडकर यांनी स्पष्ट केले की, 'मिताक्षरा कायद्याने मालमत्तेचा मोठा भाग सामाईक वारसांच्या एकत्र संपत्तीच्या बाहेर असताना आणि सामाईक वारसांच्या संपत्तीच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास अनैतिक कर्ज सोडल्यास बापाला संपत्तीची विल्हेवाट लावण्याचा अनिर्बंध अधिकार असताना, मुलग्याला वाटेल तेव्हा संपत्तीच्या विभाजनाचा हक्क असताना, त्याला त्या संपत्तीवर बोजा निर्माण करण्याचा हक्क असताना आणि त्या बोजापोटी सावकारास संपत्तीच्या विभक्तीकरणाचा दावा करण्याचा अधिकार असताना, जिला भक्कम म्हणता अशी ही पद्धत आहे काय?

हिंदू कोड बिलाने काहीतरी भयकर केले आहे असे परंपरावादी भारतीयांची ओरड निष्फळ होती असेच म्हणावे लागेल. तर प्रचलीत वस्तुस्थितीला कायद्याचे प्रारूप देताना डॉ. आंबेडकर प्रत्येक व्यक्ती व तिची संपत्ती यांची मान्यता देण्यासाठी, उपभोगासाठी, साठवण्यासाठी व कर्ज परत फेडीसाठीची जबाबदारी निश्चित करताना दिसतात.

६) हिंदू कायद्यातील स्त्रीधन मिळकत, विधवेची मिळकत, त्याच्या वारसाच्या वेगवेगळया पद्धती या सर्व गोंधळातून बाहेर पडण्यासाठी डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालील सिलेक्ट कमिटीने असा निर्णय घेतला की, संपत्तीच्या अधिकाराच्या बाबतीत समानता असावी आणि स्त्रीला संपत्ती धारण करता यावी.त्यामुळे हिंदू कोड बिलामध्ये स्त्रीच्या संपत्तीच्या मालकी हक्काबाबत असणारी विविधता, गुंतागुंत संपवून, संपूर्ण हिंदू समाजासाठी एकच कायदा निर्माण करण्याच्या हेतूने मांडणी केली.

मनुस्मृतीने स्त्रीला नाकारलेला संपत्तीचा अधिकार 'डॉ. आंबेडकरांच्या हिंदू कोड बिला' मध्ये देण्यात आला. तसेच तत्कालीन परिस्थितीत प्रचलीत असणाऱ्या विविध हिंदू कायद्यांची विविधता यांच्यामध्ये सुसूत्रीकरण निर्माण करण्यात आले. तसेच संपूर्ण भारताचा भौगोलीक अर्थाने विचार करून छोट्या-छोट्या प्रदेशात काही वेगवेगळया रूढी, प्रथा अस्तित्वात होत्या त्या नष्ट करून, संपूर्ण भारताला एकच कायदा स्त्रीधन व वारसाच्याबाबत निर्माण करण्याचा प्रयत्न हिंदू कोड बिलामध्ये डॉ. आंबेडकरांनी केलेला होता.

स्त्रिया जर एका प्रकारची संपत्ती विकण्यास किंवा विल्हेवाट लावण्यास समर्थ असतील, तर कोणत्याही प्रकारची संपत्ती विकण्यास किंवा तिची विल्हेवाट लावण्यास त्या समर्थच असल्या पाहिजेत. या समानतेच्या आधारावर स्त्रियांना सर्वस्वी संपत्तीची मालकी मिळाली पाहिजे, ही भूमिका बिलामध्ये घेण्यात आली.

डॉ. आंबेडकरांच्या बिलामध्ये एक पाऊल पुढे जाऊन मुलाच्या बरोबरीने मुलगीला हिस्सा देण्यात आला. त्यामुळे डॉ. आंबेडकरांचे बिल क्रांतिकारी यासाठी होते की, त्यांनी मुलग्याच्या बरोबरीने मुलगीला संपत्तीमध्ये समान वाटा देऊ करून समतेचा आरंभ केला. तसेच स्वी आणि संपत्ती याबाबत भारतीय समाजात असणाऱ्या विविध गैरसमज, वाईट विचार यांना नष्ट करून समताधिष्ठीत आधुनिक समाजाची सुरूवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर करताना दिसतात.

**निष्कर्ष :-**

१) स्त्रियांच्या हक्कांबाबतचा डॉ. आबेडकरांचा दृष्टिकोन खूप व्यापक होता असे दिसते. त्यांच्या या व्यापक दृष्टिकोनामुळेच संविधानात 'एक व्यक्ती एक मूल्य' या तत्त्वावर स्त्रियांना एक मानव म्हणून मान्यता देण्यात आली.

२) स्त्री मुक्तीचा लढा हा पुरूष विरोधी लढा नाही असे त्यांचे मत होते. तर पुरूष वर्चस्वाची भूमिका ज्या धार्मिक बंधनांनी निर्माण केली. त्या बंधनांना तडा देण्याची किंवा ती बंधने नष्ट करण्याची ताकद स्त्री मुक्तीच्या लढ्यात पाहिजे यासाठी धर्माची चिकित्सा करून, विज्ञाननिष्ठ स्त्री-पुरूष समानतेवर आधारलेल्या धर्माचा स्वीकार करण्यात स्त्रीच्या सर्वांगीण उन्नतीचा मार्ग आहे असे ते म्हणतात.

३) स्त्रियांना गुलामगिरीत लोटणारे घटक नष्ट करणे, स्त्रियांना त्याच्या हक्कांची जाणीव करून देणे व त्यांना कायदेशीर हक्क बहाल करणे अशा त्रिस्तरीय पातळीवर डॉ. आंबेडकरांचा स्त्री सुधारणावादी दृष्टीकोन कार्य करताना दिसतो.

४) दायभाग पद्धतीमध्ये विधवेला तिच्या पतीचा हिस्सा मिळण्याची व्यवस्था होती. तो हिस्सा द्यावा लागू नये म्हणून तिला अमानवीय कृतीने म्हणजे सतीच्या प्रथेने संपवले जाई. पण धार्मिक रूढीच्या दृष्टीने ती पतीप्रेमापोटी सती गेली असे भासवले. पण वास्तविक मालमतेचा खरा प्रश्न त्या प्रथेच्या निर्मितीमागे असलेला दिसतो. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी या प्रथेच्या मूळ गाभ्याला हिंदू कोड बिलामध्ये धक्का दिला.

५) एका बाजूला स्त्री पुरूष समान संपत्तीच्या हक्काची अंमलबजावणी, तर दुसऱ्या बाजूला संपत्तीच्या विभाजनामुळे निर्माण होणाऱ्या समस्येची जाणीव यातून त्यांची राष्ट्रबांधणीची संकल्पना तयार होते. पण राष्ट्रबांधणीच्या अतिरेकामध्ये ते स्त्रियांच्या अधिकाराला कुठेही धक्का लागू देत नाहीत. ही त्यांच्या कार्यातील समतोलता दिसते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) मून वसंत (संपा), डॉ. बाबासाहेब आबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर, १९९०.

२) वाघमारे भारत (संकलन), हिंदू कोड बिलावरील गाजलेली भाषणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, प्रबुद्ध भारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, नागपूर, प्रथम आवृत्ती, ६ डिसेंबर, २०१७.

३) गणवीर रत्नाकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, नेहा प्रकाशन, नागपूर., द्वितीय संस्करण, ऑक्टोंबर, २००४.

४) गायकवाड किशोर, घटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर, श्री गंधर्व-वेद प्रकाशन, पुणे., नोव्हेंबर, २०१०.

५) खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, सुगावा प्रकाशन, पुणे., सहावी आवृत्ती, डिसेंबर, २०१५.

६) लांजेवार डॉ. ज्योती, फुले आंबेडकर आणि स्त्री-मुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन, नागपूर., तृतीय आवृत्ती, ऑक्टोंबर, २०१६.

७) मून मीनाक्षी (संपा.), फुले आंबेडकरी स्त्री चळवळ, समता प्रकाशन, नागपूर चतुर्थ आवृत्ती, डॉ. आबेडकर जयंती, २०११.

८) पवार उर्मिला, मून मीनाक्षी, आम्हीही इतिहास घडवला, आंबेडकरी चळवळीत स्त्रियांचा सहभाग, सुगावा प्रकाशन, पुणे.

९) सूर्या डॉ. अनिल, प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल. सुगावा प्रकाशन, पुणे.. प्रथमावृत्ती, १५ ऑक्टोबर, २०१०.